आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

७ जून २०२४ - शुक्रवार

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाचे नेते म्हणून नरेंद्र मोदी यांची निवड आज एकमतानं झाली. रालोआच्या नवनिर्वाचित खासदारांची बैठक आज नवी दिल्लीत संसद भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात झाली. संरक्षण मंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंग यांनी नरेंद्र मोदी यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. भाजपाचे अमित शहा, नितीन गडकरी, जनता दल सेक्युलरचे एच डी कुमारस्वामी, तेलुगु देसमचे अध्यक्ष चंद्राबाबू नायडू, जनता दल संयुक्तचे अध्यक्ष नीतिशकुमार, तसंच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि इतर सदस्य पक्षांनी प्रस्तावाला अनुमोदन दिलं. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सर्व नवनिर्वाचित खासदार तसंच भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीदेखील या बैठकीला उपस्थित होते. विजयी खासदारांचं अभिनंदन आणि स्वागत प्रधानमंत्र्यांनी केलं. आपल्या भाषणात मोदी म्हणाले......

**बाईट- मोदी**

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज चालू आर्थिक वर्षातला द्वैमासिक पतधोरणाचा दुसरा आढावा जाहीर केला. सलग आठव्यांदा रेपो दर साडे सहा  टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय बँकेनं घेतला आहे.  त्यामुळे आता स्थायी ठेवींवरचा व्याजदर सव्वा-सहा टक्के, तर मुदत ठेवींवरचा व्याजदर आणि बँकेद्वारे आकारला जाणारा व्याजदर पावणे-सात टक्के इतका राहील.

आर्थिक विकासाला चालना देताना, चलनफुगवट्याचा दर आटोक्यात रहावा, यासाठी बँकेद्वारे केला जाणारा वित्तपुरवठा सीमित ठेवण्याचा निर्णयही पतधोरण समितीनं बहुमतानं पारित केला. महागाईचा दर आणि विकास दरात समतोल साधला जात असल्याचं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी पतधोरण जाहीर करताना सांगितलं. ग्राहक दर निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर, दोन्ही बाजूंनी २ टक्के फरकासह ४ टक्क्यांवर स्थिर राहील याची रिझर्व बँकेनं दक्षता घ्यावी, असे निर्देश सरकारनं दिल्याचं ते म्हणाले. यंदाचा मान्सून सर्वसामान्य राहील, या अपेक्षेनं वाढती महागाई आटोक्यात ठेवण्याचा पतधोरण समितीचा प्रयत्न राहील असं शक्तिकांत दास यांनी सांगितलं. दरम्यान, चालू आर्थिक वर्षात विकास दर पूर्वीच्या अंदाजापेक्षा जास्त, म्हणजे ७ पूर्णांक २ दशांश टक्के इतका राहील, असा रिझर्व बँकेचा अंदाज आहे. यापूर्वी तो ७ टक्के राहील असा अंदाज होता.

**<><><><><>**

राज्य विधानपरिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं माघार घेतली आहे. मनसेतर्फे अभिजीत पानसे यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र आज मुदतीच्या शेवटच्या दिवशी त्यांनी अर्ज न भरण्याचा निर्णय घेतला. या निवडणुकीसाठी शिवसेनेचे संजय मोरे आणि भाजपाचे निरंजन डावखरे रिंगणात आहेत.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार गटाचे अमित सरैय्या यांनी उमेदवारी अर्ज आज दाखल केला.

<><><><><>

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेत आज झालेल्या सामन्यात स्कॉटलंडनं नामिबियाचा ५ गडी राखून पराभव केला. नामिबियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि निर्धारित २० षटकांमध्ये ९ गडी गमावून १५५ धावा केल्या. स्कॉटलंडनं हे आव्हान १८ षटकं आणि ३ चेंडूंतच ५ गड्यांच्या मोबदल्यात १५७ धावा काढून पूर्ण केलं. या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना कॅनडा आणि आयर्लंड यांच्यात रात्री ८ वाजता सुरू होईल.

<><><><><>

भारतीय उपखंडात नैर्ऋत्य मोसमी पावसाची आगोकूच सुरु असून पुढल्या २४ तासांत कोकणात अनेक ठिकाणी सोसाट्याचे वारे आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, हवामान विभागानं यलो अलर्ट जारी केला आहे.

मोसमी पाऊस राज्यात काल दाखल झाला असून, गेल्या २४ तासांत रत्नागिरी तालुक्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली. लातूर जिल्ह्यात आज मान्सूनपूर्व पावसानं जोरदार हजेरी लावली.

<><><><><>

बुलडाणा जिल्ह्यात मुंबई-नागपूर महामार्गावर आज सकाळी एक खासगी बस उलटून झालेल्या अपघातात ३० जण जखमी झाले. यापैकी ८ जणांची प्रकृती गंभीर आहे. जखमींना सिंदखेड राजा आणि जालना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं स्थानिक पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

वाशीम जिल्हा उपनिबंधक अधिकारी दिग्विजय राठोड यांना काल लाचलुचपत प्रतिबंध विभागानं ६ लाख रुपयांची लाच घेताना अटक केली.

**<><><><><>**